संदर्भ क्र.सुरमं/डीए/राभाआ/२०१८-९९९.
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,सानपाडा, नवी मुंबई ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/०२२-२७७५१३८६,फॅक्स क्र.०२२-२७७५१३८७
दिनांक : ०९ फेब्रुवारी २०१८

# आ दे श

## विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जानेवारी २०१८ पासून करण्यांत येणारी सुधारणा.

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/डीए/अखुपें/२०१७-१०८०, दि.१४.०२.२०१७ च्या आदेशान्वये दि.१ जानेवारी, २०१७ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/किवेअ/विभ/२०१८-०१/कार्या-१०, दि. ०६.०२.२०१८, अन्वये दि.१ जानेवारी २०१८ ते दि. ३० जुन २०१८ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.३,५६४.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ०७.०२.२०१८ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जानेवारी २०१८ ते दि. ३० जुन २०१८ या कालावधीकरीतां रु.३,५६४.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे.

नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०१७-७१८८, दि.१७ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

**दि.१ जानेवारी २०१८ ते ३० जुन २०१८ या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.**

| अ. क्र. | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (मूळ वेतनाच्या @४६.७५%) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, प्रवास व शैक्षणिक भत्त्यावर @ ४.७५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ महिला सु.रक्षक | ७,६००.०० | ३,५६४.०० | २,२३३.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १६,८९७.०० | ५,२१९.०० | २४४.०० | २२,३६०.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ७,८७५.०० | ३,५६४.०० | २,२८८.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १७,२२७.०० | ५,३४८.०० | २४६.०० | २२,८२१.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ८,५७५.०० | ३,५६४.०० | २,४२८.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,०६७.०० | ५,६७५.०० | २५३.०० | २३,९९५.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | ८,८००.०० | ३,५६४.०० | २,४७३.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,३३७.०० | ५,७८०.०० | २५५.०० | २४,३७२.०० |
| ५ | सुरक्षा अधिकारी | ९,२५०.०० | ३,५६४.०० | २,५६३.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,८७७.०० | ५,९९१.०० | २५९.०० | २५,१२७.०० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | ९,७००.०० | ३,५६४.०० | २,६५३.०० | १५००.०० | १३००.०० | १००.०० | ६००.०० | १९,४१७.०० | ६,२०१.०० | २६४.०० | २५,८८२.०० |

***मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४६.७५% दराने व घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ४.७५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

कामगार राज्य विमा मंडळाने दि.०१ ऑगस्ट २०१६ पासून अधिसूचनेनुसार पालघर व ठाणे जिल्ह्यातील मुख्य मालकांकरीता नव्याने कामगार राज्य विमा योजना लागू करण्यांत आलेली आहे व त्यानुसार पालघर व ठाणे जिल्ह्यातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.००% दराने व घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिरीक्त कामाचा मोबदला यावर ३.००% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जानेवारी २०१८ पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

सही/-
**अध्यक्ष**
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :
प्रति,
मे. ..............................................., नों.क्र. ........., युनिट क्र. .........
..........................................................

*This being a computerised printed copy, signature is not required.*

*Local/Mydoc/WGREVNOTICE 18 - 1 JAN 18 in Mar pg1